RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक ५३] गुरूवार, नोव्हेंबर २, २०१७/कार्तिक ११, शके १९३९ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक १०१

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २५.— महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश. | पृष्ठे (१-४) |


नगरविकास विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २ नोव्हेंबर २०१७.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XXV OF 2017.**

AN ORDINANCE
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA
MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL
TOWNSHIPS ACT, 1965.

**सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २५.**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही;

१९६५ चा महा. ४०. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे;

**त्याअर्थी,** आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१७ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० यात कलम ३४१ब-१अ समाविष्ट करणे.

२. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम ३४१ब-१ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९६५ चा महा. ४०.

नगरपंचायतीच्या अध्यक्षाची थेट निवडणूक.

"**३४१ब-१अ.** (१) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१७ याच्या प्रारंभाच्या दिनांकानंतर, नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतीत, कलम ५१-१अ याच्या तरतुदींना अधीन राहून, प्रत्येक नगरपंचायतीचा एक अध्यक्ष असेल व तो कलम ३४१ब अन्वये नगरपंचायतीच्या प्रभागांच्या निवडणुकीसाठी तयार केलेल्या मतदारयादीत ज्यांचे नाव समाविष्ट असेल, अशा व्यक्तींद्वारे निवडण्यात येईल. २०१७ चा महा. अध्या. २५.

(२) नगरपंचायतीचा पंचायत सदस्य म्हणून निवडून येण्यास अर्ह असणारी प्रत्येक व्यक्ती, पोट-कलम (१) अन्वये निवडणुकीत अध्यक्ष म्हणून निवडून येण्यास अर्ह असेल.

(३) अध्यक्षाची निवडणूक ही, नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीबरोबर एकाच वेळी घेण्यात येईल आणि नगरपंचायतीच्या निवडणुका घेण्यासंबंधीची कार्यपद्धती अशा निवडणुकीस, योग्य त्या फेरफारांसह, लागू होईल.

(४) जर निवडणुकीच्या वेळी अध्यक्ष निवडण्यात आला नाही तर, अध्यक्ष निवडण्यासाठी नव्याने निवडणूक घेण्यात येईल, आणि जर नव्याने घेतलेल्या निवडणुकीत अध्यक्ष निवडून दिला नाही तर, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, अशी रिक्त जागा, निवडून आलेल्या पंचायत सदस्यांद्वारे त्यांच्यामधून निवडणुकीद्वारे भरण्यात येईल.

(५) पोट-कलम (४) किंवा (७) अन्वये निवडून आलेली कोणतीही व्यक्ती, या कलमान्वये निवडणुकीत यथोचितरीत्या निवडून आली असल्याचे मानण्यात येईल.

(६) जर अध्यक्षांच्या निवडणुकीत, समसमान मते पडली तर, त्या निवडणुकीचा निकाल राज्य निवडणूक आयुक्ताकडून किंवा, त्या प्रयोजनार्थ त्याच्याकडून नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याद्वारे चिठ्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरविण्यात येईल.

(७) जर निवडून आलेल्या पंचायत सदस्यांच्या मुदतीत, अध्यक्षाचे पद कोणत्याही कारणामुळे रिक्त झाले तर, त्याबाबतीत, पोट-कलमे (१) ते (६) यांमध्ये तरतूद केलेली कार्यपद्धती लागू होईल, आणि असा अध्यक्ष, असे पद रिक्त झाले नसते तर त्याचा पूर्वाधिकारी अशा नैमित्तिक रिक्त पदावर जेवढ्या मुदतीकरिता राहिला असता केवळ तेवढ्याच उर्वरित मुदतीकरिता पदावर राहील :

परंतु, निवडून आलेल्या पंचायत सदस्यांचा पदावधी ज्या दिनांकास समाप्त होत असेल त्या दिनांकापूर्वी सहा महिन्यांच्या आत पद रिक्त झाले तर, ते पद, निवडून आलेल्या पंचायत सदस्यांमधून निवडणुकीद्वारे भरण्यात येईल.

(८) अध्यक्षाच्या निवडणुकीसंबंधात कोणताही वाद निर्माण झाल्यास, त्याबाबतीत कलम २१ च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील.

(९) अध्यक्ष, नगरपंचायतीची आणि अध्यक्षाची सार्वत्रिक निवडणूक झाल्यानंतर, अध्यक्षाचे नाव व निवडून आलेल्या पंचायत सदस्यांची नावे **राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून पंचवीस दिवसांच्या आत नगरपंचायतीची पहिली सर्वसाधारण सभा बोलावील. या सभेमध्ये कलम ९ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ब) अन्वये, पंचायत सदस्यांचे नामनिर्देशन, या कलमान्वये निवडून आलेल्या अध्यक्षाकडून विहित रीतीने करण्यात येईल. ".

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ३४१ब-२ मध्ये, पोट-कलम (६) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३४१ब-२ ची सुधारणा.

२०१७ चा महा. अध्या. २५. "(६अ) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१७ याच्या प्रारंभानंतर ज्या नगरपंचायतींचे अध्यक्ष थेट निवडलेले असतील त्या नगरपंचायतींच्या बाबतीत, या कलमाच्या तरतुदी पुढील फेरबदलांसह लागू असतील :—

(एक) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(१) प्रत्येक नगरपंचायतीचा एक उपाध्यक्ष असेल व तो कलम ३४१ब-१अ च्या पोट-कलम (९) अन्वये बोलविण्यात आलेल्या पहिल्या सर्वसाधारण सभेमध्ये, निवडून आलेल्या पंचायत सदस्यांद्वारे त्यांच्यामधून निवडला जाईल.";

(दोन) पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(३) जर उपाध्यक्षाच्या निवडणुकीत समसमान मते पडली तर, कलम ३४१ब-१अ अन्वये निवडून आलेल्या अध्यक्षास दुसरे किंवा निर्णायक मत असेल.";

(तीन) पोट-कलम (६) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(६) कलम ५५अ च्या तरतुदींना व या अधिनियमाच्या इतर तरतुदींना अधीन राहून, उपाध्यक्ष, तो निवडून आल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करील आणि त्याची मुदत नगरपंचायतीच्या मुदतीबरोबरच समाप्त होईल.".".

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ३४१ब-३ मध्ये, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :— सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३४१ब-३ ची सुधारणा.

"(४) जेव्हा अध्यक्ष कलम ३४१ब-१अ अन्वये निवडून आला असेल तेव्हा, या कलमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत.".

५. मुख्य अधिनियमाचे कलम ३४१ब-४ याला, त्याचे पोट-कलम (१) म्हणून नवीन क्रमांक देण्यात येईल आणि असा नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलमे जादा दाखल करण्यात येतील :— सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३४१ब-४ ची सुधारणा.

"(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ३४१ब-१अ च्या पोट-कलम (१) अन्वये निवडून आलेल्या अध्यक्षाचा पदावधी पाच वर्षे इतका असेल आणि त्याची मुदत नगरपंचायतीच्या मुदतीबरोबरच समाप्त होईल.

२०१७ चा महा. अध्या. २५. (३) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१७ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी ज्या नगरपंचायतींच्या बाबतीत सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या असतील अशा नगरपंचायतींच्या संबंधात जे अध्यक्ष पद धारण करीत असतील अशा अध्यक्षांच्या पदाच्या मुदतीस पोट-कलम (२) मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही आणि या कलमाच्या तरतुदी ह्या अशा प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिनांकास अस्तित्वात असल्याप्रमाणे अशा अध्यक्षाच्या पदाच्या मुदतीच्या संबंधात लागू असल्याचे चालू राहील.".

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ३४१ब-५ मध्ये, पोट-कलम (१) मधील परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :— सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३४१ब-५ ची सुधारणा.

"परंतु, थेट निवडून आलेल्या अध्यक्षाच्या बाबतीत तो निवडून आल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीच्या आत, असा कोणताही ठराव मांडता येणार नाही, आणि पंचायत सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेल्या अध्यक्षाच्या बाबतीत, अशा निवडीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत, असा कोणताही ठराव आणता येणार नाही.".

## निवेदन.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) याच्या कलम ३४१ब-१ च्या तरतुदीनुसार, नगरपंचायतीचा अध्यक्ष निवडून आलेल्या पंचायत सदस्यांद्वारे त्यांच्यामधून निवडण्यात येतो. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ९) याच्या प्रारंभाच्या दिनांकानंतर म्हणजे १९ मे २०१६ नंतर कलम ५१-अ-१अ च्या तरतुदींनुसार घेण्यात येणाऱ्या नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये नगरपरिषदेचा अध्यक्ष नगरपरिषदेच्या मतदारांकडून निवडून दिला जातो.

सद्य: स्थितीचा आढावा घेतल्यानंतर आणि नगरपरिषद व नगरपंचायतीच्या अध्यक्षांच्या निवडणुकीत एकरूपतेची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने, उक्त अधिनियमांच्या तरतुदींमध्ये यथोचितरीत्या फेरबदल करणे इष्ट वाटते.

२. प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :--

(एक) नगरपंचायतीचा अध्यक्ष नगरपंचायतीच्या मतदारांद्वारे निवडण्यात येईल, अशी तरतूद करण्याचे प्रस्तावित केले आहे.

(दोन) परिणामी, जेथे अध्यक्ष नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये नगरपंचायतीच्या मतदारांद्वारे निवडला जातो तेथे, उपाध्यक्षाच्या निवडणुकीच्या संबंधातील तरतुदींमध्येदेखील फेरबदल करण्याचे प्रस्तावित केले आहे.

या प्रयोजनांसाठी उक्त अधिनियमामध्ये कलम ३४१ब-१अ समाविष्ट करण्याचे आणि कलमे ३४१ब-२, ३४१ब-३, ३४१ब-४ आणि ३४१ब-५ यांमध्ये यथोचित सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २ नोव्हेंबर २०१७.

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मनीषा पाटणकर-म्हैसकर,**
शासनाच्या प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A,NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.